महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३२,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
Email ID:- sm२.sesd-mh@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२३/प्र.क्र.४२८/एसएम-२ दिनांक:- ०५ मार्च, २०२४.

# मान्यता पत्र

प्रति,

अध्यक्ष / सचिव,
दयानंद ॲंग्लो वेदिक कॉलेज ट्रस्ट ॲन्ड मॅनेजमंट सोसायटी नवी दिल्ली.

विषय- महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र...

दयानंद ॲंग्लो वेदिक कॉलेज ट्रस्ट ॲन्ड मॅनेजमेंट सोसायटी नवी दिल्ली संचलित डी. ए. व्ही राव हरीशचंद्र आर्य पब्लिक स्कूल, भुमापन क्र. २०, फेटरी, ता.जि.नागपूर.

संदर्भ- इरादा पत्र क्रमांक एसएफएस-१०२३/प्र.क्र.४२८/एसएम-२, दि.०३.०७.२०२३.

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत **दयानंद ॲंग्लो वेदिक कॉलेज ट्रस्ट ॲन्ड मॅनेजमेंट सोसायटी नवी दिल्ली** या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून डी. ए. व्ही राव हरीशचंद्र आर्य पब्लिक स्कूल, भुमापन क्र. २०, फेटरी, ता.जि.नागपूर **या नवीन प्राथमिक ते उच्च माध्यमिक** (इ. १ ली ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.) ही स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा सुरु करण्याकरिता अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून **दयानंद ॲंग्लो वेदिक कॉलेज ट्रस्ट ॲन्ड मॅनेजमेंट सोसायटी नवी दिल्ली संचलित डी. ए. व्ही राव हरीशचंद्र आर्य पब्लिक स्कूल, भुमापन क्र. २०, फेटरी, ता.जि.नागपूर या नवीन प्राथमिक ते उच्च माध्यमिक** (इ. १ ली ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.) या स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर शाळेचे बांधकाम सुरु करण्याकरिता, अटी व शर्तीसह इरादा पत्र दिले होते. आता, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून सदर नवीन शाळा सुरु करण्याची मान्यता, पुढील अटी व शर्तीस अधीन राहून देण्यात येत आहे.

३. अटी व शर्ती :-

१. प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तीची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तीची पूर्तता करील.

२) नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना विनियमन) अधिनियम, २०१२ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांचे, अटींचे व शर्तींचे आणि अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांचे किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किं अटींचे आणि शर्तींचे पालन करणे अनिवार्य आहे.

३) सी.बी.एस.ई. किंवा सी.आय.एस.सी.ई. किंवा सी.ए.आय.ई. किंवा आय.बी. इत्यादी मंडळाच्या संलग्नतेसाठी इच्छुक शाळा व्यवस्थापनांनी, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार, शासनाकडून ना हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

४) शाळा व्यवस्थापन, शासनाने मंजूर केलेल्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यापूर्वी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षण अधिकाऱ्यास कळवील.

५) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये नवीन शाळेची स्थापना करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेली परवानगी, ती ज्या शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केली आहे, त्याच वर्षासाठी असेल.

६) जर शाळा व्यवस्थापन, १८ महिन्यांच्या आत, शाळा सुरु करण्यास अपयशी ठरल्यास, दिलेले मान्यता पत्र रद्द होईल.

७) शाळा व्यवस्थापनास, मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण, भविष्यात, शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

८) जर शाळा व्यवस्थापनाने, शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर, त्या शाळेची परवानगी रद्द होईल.

९) अशी तरतूद करण्यात आली आहे की, स्वयं अर्थसहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व विनियमांनुसार करण्यात यावी.

१०) जिल्हानिहाय माहिती भरतेवेळी, ज्या शाळेस परवानगी देण्यात आली आहे, ती शाळा, स्वतंत्र प्रवर्ग म्हणून "स्वयंअर्थसहाय्यित शाळा" अशी माहिती भरतील व यु.डी.आय.एस.इ. क्रमांक मिळवितील. यासंबंधात, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांस, नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

११) शाळा व्यवस्थापन, शाळा परिसराच्या प्रवेशद्वारावर "स्वयंअर्थसहायित परवानगीप्राप्त शाळा" असा फलक लावतील.

१२) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तींचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरुन, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले मान्यता पत्र रद्द करु शकेल.

(विवेक सपकाळ)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत माहितीसाठी -

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर.
७. निवडनस्ती एसएम-२/ (प्र.क्र.४२८/२०२३)

NOTARY GOVT. OF INDIA

महाराष्ट्र शासन
विभागीय शिक्षणउपसंचालक नागपूर विभाग, नागपूर
बालभारती, एन.आय.टी. गार्डन समोर, धंतोली, नागपूर.
Website www.dydenagpur.org.

दुरध्वनीक्रमांक ०७१२-२४११३१८, E-mail:dydnagpur@rediffmail.com, dd.nagpur@mahedu.gov.in

जा.क्र. माध्य/अ-२/स्वअर्थ मान्यता/मार्च-२४/5542/२०२४ दिनांक:- 5 AUG 2024

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
दयानंद ॲंग्लो वेदिक कॉलेज ट्रस्ट ॲंन्ड मॅनेजमेंट सोसायटी,
नवी दिल्ली.

विषय :- महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरु करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र...
दयानंद ॲंग्लो वेदिक कॉलेज ट्रस्ट ॲंन्ड मॅनेजमेंट सोसायटी,नवी दिल्ली व्दारा संचालित डी.ए.व्ही.राव हरिशचंद्र आर्य पब्लिक स्कूल,भुमापन क्र.२०,फेटरी,ता.जि.नागपूर.

संदर्भ :-१) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचा इरादा पत्र क्र.एसएफएस-१०२३/प्र.क्र.४२८/एसएम-२ दिनांक ०३/०७/२०२३
२)महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचा मान्यता पत्र क्र.एसएफएस-१०२३/प्र.क्र.४२८/एसएम-२ दिनांक ५ मार्च २०२४

वरील विषयी आपणास कळविण्यात येतेकी, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ नवीन शाळा स्थापनकरणे करीता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता प्रस्ताव सादर केला होता. प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भक्र. ०१ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापनकरणेकरीता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता अटी व शर्तीसह इरादा पत्र दिले होते, आता सदर नवीन शाळा सुरु करण्याची संदर्भ क्र. ०२ च्या शासन निर्णयानुसार खालील अटी व शर्तीवर मान्यता दिलेली आहे.

| अ. क्र | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव व पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता | नविन शाळा/ दर्जावाढ | शाळेचा प्रकार | मंडळ संलग्नता | शाळेचे माध्यम | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १.. | नागपूर | दयानंद ॲंग्लो वेदिक कॉलेज ट्रस्ट ॲंन्ड मॅनेजमेंट सोसायटी, नवी दिल्ली. | डी.ए.व्ही.राव हरिशचंद्र आर्य पब्लिक स्कूल,भुमापन क्र.२०,फेटरी,ता.जि. नागपूर | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इ.१ ली ते १२ वी,सर्व शाखा) | सी.बी.एस.ई | इंग्रजी | २०२४-२५ |

अटी व शर्ती

१.सदर शाळा बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याव्दारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तीची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निर्देशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तीची पूर्तता करील.

२. नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, महाराष्ट्र स्वंय अर्थसहाय्यित शाळा (स्थापनाव विनियमन) अधिनियम, २०१२ याव्दारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांचे, अटींचे व शर्तीचे आणिया अधिनियमान्वये शासनाने

दिलेल्या निदेशांचे किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा अटींचे आणि शर्तींचे पालन करणे अनिवार्य आहे.

३. सी.बी.एस.ई. किंवा सी.आय.एस.सी.ई किंवा सी.ए.आय.ई किंवा आय.बी. इत्यादी मंडळाच्या संलग्नते साठी इच्छुक शाळा व्यवस्थापनांनी, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्रघेणे अनिवार्य आहे.

४. शाळा व्यवस्थापन, शासनाने मंजूर केलेल्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यापूर्वी संबंधित जिल्हयाच्या शिक्षण अधिका-यास कळवील.

५. या अधिनियमाच्या तरतुदीं अन्वये नवीन शाळेची स्थापना करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेली परवानगी, ती ज्या शैक्षणिक वर्षासाठी मंजूरकेली आहे, त्याच वर्षासाठी असेल.

६. शाळा व्यवस्थापनास अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करण्यास अपयशी ठरल्यास, दिलेले मान्यता पत्र रद्द होईल.

७. शाळा व्यवस्थापनास, मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण, भविष्यात, शासनाच्या परवानगी शिवाय बदलता येणार नाही.

८. शाळाव्यवस्थापनाने, शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणा व्यतीरीक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर, त्या शाळेची परवानगी रद्द होईल.

९. परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व विनियमांनुसार करण्यात यावी.

१०. जिल्हानिहाय माहिती भरतेवेळी, ज्या शाळेस परवानगी देण्यात आली आहे, ती शाळा, स्वतंत्र प्रवर्ग म्हणून स्वयंअर्थसहाय्यित शाळा अशी माहिती भरतीलव यु.डी.आय.एस.इ. क्रमांक मिळवितील. या संबंधात, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांस नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

११. सदर संस्थेने **"स्वयंअर्थसहाय्यित परवानगी प्राप्त शाळा"** असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

१२. या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचेकिंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तींचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरुन, कोणत्याही वेळी राज्य शासन, दिलेले मान्यता पत्र रद्द करु शकेल.

**शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल, अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.**

(स्वाक्षरी) ०५
(शिवलाल नरड)
शिक्षण उपसंचालक
नागपूर विभाग, नागपूर

प्रतिलिपी-
१. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. आयुक्त (शिक्षण) आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
४. मा. शिक्षण संचालक(प्राथमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे- ०१ यांना माहितीस्तव सविनय सादर
५. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद,नागपूर यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित. सदर संस्था बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पूर्तता करते किंवा कसे? याची तपासणी करून अहवाल या कार्यालयास सादर करावा.
६. मुख्याध्यापक, डी.ए.व्ही.राव हरिशचंद्र आर्य पब्लिक स्कूल,भुमापन क्र.२०,फेटरी,ता.जि.नागपूर यांना माहितीस्तव अग्रेषित.

NOTARY ... GOVT.

Maharashtra Government
School Education and Sports Department,
Ministry (Extension), Room No. 432,
Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mumbai-32.

Email ID:- sm2.sesd-mh@g

Number:-SFS-1023/P.No.428/SM-2 Dated 05 March, 2025

## Recognition letter

To,

President/Secretary.

Dayanand Anglo Vedic College Trust and Management Society New Delhi.

Subject- Approval letter for starting new schools on self-financed basis or upgrading existing schools under Maharashtra Self-financed Schools (Establishment and Regulation) Act, 2012
DAV Rao Harishchandra Arya Public School, operated by Dayanand Anglo Vedic College Trust and Management Society, New Delhi, Plot No. 20, Fetri. T.D. Nagpur,
Reference- Intent letter No. SFS-1023/P.No.428/SM 2 dated 03.07.2023.
Under the Maharashtra Self-Aided Schools (Establishment and Regulation) Act, 2012, the Dayanand Anglo Vedic College Trust and Management Society, New Delhi, had submitted an application for setting up a new school on self-aided basis from the academic year 2023-24, namely D. A. V. Roi Harishchandra Arya Public School, Plot No. 20, Fetri, Tal. Dist. Nagpur, from Primary to Higher Secondary (Class 1 to 12, all branches, English medium, CBSE).

In connection with your application, a letter of intent was given with terms and conditions to start the construction of a new primary to higher secondary (Class 1 to 12, all branches, English medium, CBSE) school on a self-financed basis from the academic year 2023-24 under the Maharashtra Self-Financed Schools (Establishment and Regulation) Act, 2012 and the Maharashtra Self-Financed Schools (Establishment and Regulation) Rules, 2020 at D. A. V. Rao Harishchandra Arya Public School, bhumapan No. 20, Fetri, Tal, Dist. Nagpur, managed by Dayanand Anglo Vedic College Trust and Management Society, New Delhi, under the Maharashtra Self-Financed Schools (Establishment and Regulation) Act, 2022. Now, approval to start the said new school from the academic year 2024-25 is being given subject to the following terms and conditions.

**Terms and Conditions**

1) The proposed school shall comply with all the standards, terms and conditions prescribed by the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 and the Maharashtra Free and Compulsory Education of Children Rules, 2011 and the directions given by the Government under this Act or the standards or criteria or terms and conditions specified by the Government from time to time.
2) It is mandatory for the registered institution or company established by the trust to comply with all the norms, terms and conditions prescribed by the Maharashtra Self-Aided Schools (Establishment and Regulation) Act, 2012 and the directions issued by the Government under this Act or the norms, terms and conditions specified by the

NOTARY GOVT. OF INDIA

Government from time to time.

3) It is mandatory for school managements interested in affiliation with boards like CBSE, CISCE, CAIE, AAGV, etc. to obtain a no-objection certificate from the Government as per the instructions given by the Government from time to time.

4) The school management shall inform the education officer of the concerned district before the commencement of the academic year approved by the government.

5) To establish a new school or to upgrade the status of an existing school under the provisions of this Act The permission granted will be for the same academic year for which it is granted.

6) If the school management fails to start the school within 18 months, the grant recognition letter will be cancelled.

7) The School Management, cannot change the approved medium of education, place of occurrence or the location of the school in the future without permission.

8) If the school management establishes the school premises location other than the location approved by the government, the permission of that school will be cancelled.

9) It has been provided that teachers and non-teaching staff in self-financed schools Recruitment should be done as per the prevailing rules and regulations of the government.

10) While filling district-wise information, the schools which have been given permission will fill the information as "Self-financed schools" as a separate category and will get UDISE number. In this regard State Project Director Maharashtra Primary education Council Mumbai has been appointed as the nodal officer.

11. The said organization will be required to put up a public notice board saying "Self-financed permitted school" at the entrance outside the school.

12. The State Government may, at any time, after obtaining the approval given, cancel any contract for any contravention of any provision of this Act or of any rules made there under or for failure to comply with any directions given under the Act or with any standards or standards or conditions specified by the Government from time to time.

It will be necessary to implement the existing rules and regulations of the government and such rules as the government may issue from time to time.

(Vivek Sapkal)
Executive Officer, Government of Maharashtra,

For copy information

1 Commissioner, Education, Maharashtra State, Pune
2. State Project Director, Maharashtra Primary Education Council, Mumbai,
3. Director, (Secondary and Higher Secondary), Maharashtra State, Pune
4. Director, (Primary), Maharashtra State, Pune.
5. Deputy Director of Divisional Education, Nagpur Division, Nagpur.
6 Education Officer (Primary/Secondary), Zilla Parishad, Nagpur

7. Nivadnasti SM-2/ (P.No.428/2023)

NOTARY

Divisional Deputy Director of Education Nagpur Division, Nagpur
Balbharti, N.I.T. Garden Opposite, Dhantoli, Nagpur,
Website www.dydenagpur.org.

Telephone number 0712-2411318, E-mailydnagpur@rediffmail.com, dd.nagpur@mahedu.gov.in

Madhyan/A-2/Swaarth Manavta/March-24/55/82/2024 J.No.

Date:-5 AUG 2024

To

President Secretary

Dayanand Anglo Vedic College Trust and Management Society,

New Delhi.

Subject-Approval letter for starting new schools on self-financed basis or upgrading existing schools under Maharashtra Self-financed Schools (Establishment and Regulation) Act, 2012.. DAV Rao Harishchandra Arya Public School, operated by Dayanand Anglo Vedic College Trust and Management Society, New Delhi, Plot No. 20, Fetri. T.D. Nagpur,

References:-1) Letter of intent from the School Education and Sports Department, Government of Maharashtra No. SFS-1023/Pr.No.428/SM-2 dated 03/07/20232)

2)Approval letter from the School Education and Sports Department, Government of Maharashtra No. SFS 1023/Pr.No.428/SM-2 dated 5 March 2024

In the above regard, it is hereby informed that your organization had submitted a proposal for establishing a new school upgrading the status of an existing school for the academic year 2023-24 under the Maharashtra Self-Aided Schools (Establishment and Regulation) Act, 2092. As per the proposal, your organization was given a letter of intent with terms and conditions for establishing a new school/upgrading the status of an existing school as per the Government Decision No. Ot, now the said new school has been approved as per the Government Decision No. 02 on the following terms and conditions.

| Sr. No. | District | Name and Address | Name of the school needing affiliation | New school /Up gradation | Type of School | Management Cohesion | Medium of School | Affiliation Year |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nagpur | Dayanand Anglo Vedik College Trust and Management Society. New Delhi | D.A.V.Rao Harishchandra Arya Public School | School | CBSE primary to higher Secondary (E.1L To 128, all branch) | CBSE | English | 2024-25 |

## Terms and Conditions

1. The said school complies with all the standards, terms and conditions prescribed under the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 and the Maharashtra Right of Children to Free and Compulsory Education Rules, 2011 and this Comply with the directions given by the Government under the Act or the standards or criteria or terms and conditions specified by the Government from time to time.

2. The registered institution, trust or company shall comply with all the norms, terms and conditions prescribed by

the Maharashtra Self-financing Schools (Regulation of Establishment) Act, 2012 and the Government under this Act. it is mandatory to comply with the instructions given or the standards or terms and conditions specified by the government from time to time

3. it is mandatory for school managements desirous of affiliation to CBSE or CISCE or CA, IIE or IB etc. boards to obtain a no-objection certificate from the Government as per the instructions issued by the Government from time to time.

4. The school management shall inform the Education Officer of the concerned district before the commencement of the academic year approved by the Government

5. Permission granted for the establishment of a new school or for the upgrading of the status of a school under the provisions of this Act shall be for the same academic year for which it is granted.

6. If the school management fails to start the school within eighteen months, the approval letter given will be void.

7. The school management cannot change the approved medium of education or the location of the school in the future without the permission of the government.

8. If the school management has established a school at a location other than the location approved by the government, the permission for that school will be cancelled.

9. Recruitment of teachers and non-teaching staff in permitted self-financing schools should be done as per the prevailing rules and regulations of the government.

10. While filing district-wise information, the school to which permission has been granted should be entered as a separate category Self-financed schools will get the information from the recruitment office UDISE, In this regard, the State Project Director, Maharashtra Primary Education Council, Mumbai has been appointed as the nodal officer.

11. The said institution shall put up a black board stating "Self-financed permitted school at the entrance outside the school. will be necessary.

12. The stae government may at any time cancel the certificate of authencity issue on ground of violation of any of provision of the act or the rules made there under or failure to comply with any directions given under that or with the terms and conditions specified by the government from time to time .

It will be necessary to implement the existing rules and regulations of the government and such rules as the government may issue from time to time .

(ULhas Narad)

Deputy Director of Education Nagpur Division, Nagpur

copy-

1. Submitted for information to Hon. Principal Secretary, School Education and Sports Department, Mantralaya, Mumbai 32.
2. Submitted for information to the Hon'ble Commissioner (Education) Commissionerate, Maharashtra State, Pune.
3. Submitted to the Hon'ble Director of Education (Secondary and Higher Secondary), Maharashtra State, Pune for information.
4. Submitted for information to Hon'ble Director of Education (Primary), Directorate of Education, Maharashtra State, Pune-01.
5. Forwarded to the Education Officer (Primary/Secondary), Zilla Parishad, Nagpur for information and further action. Whether the said institution fulfills the provisions of the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 or not? A report should be submitted to this office after checking.
6. To the Principal, D.A.V. Rao Harishchandra Arya Public School, Plot No. 20, Fetri, Tal. Dist. Nagpur

NOTARY GOVT. INDIA

NOTARIAL REG.
ENTRY NO. 1876
DATE 11/12/2025

NOTARY
Sulbha Bhaskar Saikhede
Nagpur
(M.S.) India
GOVT. OF INDIA

ATTESTED

Sulbha Bhaskar Saikhede
Advocate & Notary
Plot No. 72, Vrundawan Nagar,
Near Hasanbag, Nagpur, Maharashtra

NOTARIAL
NOTARIAL
NOTARIAL
NOTARIAL
NOTARIAL

CANCELLED

NOTARY
SULBHA BHASKAR SAIKHEDE
Nagpur
(M.S.) INDIA
REGN. NO.
46490
GOVT. OF INDIA